# हुतात्मा पोलिसांना अभिवादन

## पोलिस स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रम



पोलिस स्मृतिदिनाच्या निमित्ताने गेल्या वर्षभरात हुतात्मा झालेले पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलिस संशोधन केंद्र (सीपीआर) येथील हुतात्मा स्मारक येथे सोमवारी सकाळी आदरांजली वाहण्यात आली.

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

देशात गेल्या वर्षभरात हुतात्मा झालेल्या पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलिस स्मृतिदिनाच्या निमित्ताने पोलिस संशोधन केंद्र (सीपीआर) येथील हुतात्मा स्मारक येथे सोमवारी आदरांजली वाहण्यात आली. या वेळी पुणे व पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या तुकड्यांनी शोक कवायतीमध्ये सहभाग घेत हवेत फैरी झाडून हुतात्म्यांना अभिवादन केले.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा सत्र न्यायाधीश सुनील गोसावी उपस्थित होते. पुण्याचे पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम, पिंपरी-चिंचवडचे पोलिस आयुक्त संदीप बिष्णोई, राज्य गुन्हे अन्वेषण विभागाचे प्रमुख अतुलचंद्र कुलकर्णी, बिनतारी संदेश विभागाचे प्रमुख रितेश कुमार, कारागृहाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक सुनील रामानंद, पुण्याचे पोलिस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली.

प्रत्येक वर्षी २१ ऑक्टोबर हा पोलिस स्मृतिदिन म्हणून साजरा केला जातो. या वर्षी कर्तव्यावर असलेले २९२ पोलिस अधिकारी, जवान व पोलिस कर्मचारी हुतात्मा झाले आहेत. या सर्वांना सीपीआर येथील हुतात्मा स्मारक येथे पुष्पहार अर्पण करून सर्वांनी आदरांजली वाहिली.

या वेळी काढलेल्या परेडचे कमांडर म्हणून सहायक पोलिस आयुक्त विजय चौधरी यांनी; तर सेकंड कमांडर म्हणून पोलिस निरीक्षक रामकृष्ण गोटमवाड यांनी नेतृत्व केले. या वेळी सेवानिवृत्त अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.